दैनिक निळे प्रतिक

## ही वृत्ती संपुष्टात आणण्याची भूमिका

**मुंबई**–नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे सध्या राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या प्रकरणात गंभीर आरोप करताना खळबळजनक माहिती समोर आणली आहे. त्यांच्या दाव्यानुसार, पुराव्यांमध्ये अशोक खरात आणि रुपाली चाकणकर यांच्यात १७७ वेळा, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्याला १७ वेळा फोन केल्याचे दिसून येत आहे. हे फोन कॉल नेमके कोणत्या कारणासाठी करण्यात आले, असा थेट सवाल दमानिया यांनी उपस्थित केला असून, त्यांच्या या आरोपांवर आता मंत्री उदय सामंत यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.उदय सामंत म्हणाले, उदय सामंतांनी फोन केलाय का? आता ज्यांचे फोनवर बोलणे झाले, त्यांनी अशोक खरातच्या कृत्याचे समर्थन केलेले नाही. आता त्याने या नेत्यांशी बोलणे झाल्यावर त्याचा गैरफायदा घेऊन हे कृत्य केले आहे. मात्र ही वृत्ती संपुष्टात आणण्याची भूमिका शिवसेनेची आहे. आमच्या बाजूला येऊन काही लोक फोटो घेतात. मग त्याने काही चुकीचे कृत्य केले तर त्यात आम्ही सामील आहोत का? असा सवाल सामंत यांनी उपस्थित केला.


## बच्चू कडू यांच्यावर हत्येचा गंभीर आरोप

**मुंबई**–राजकीय वैमनस्यातून आपल्याला अपघातात ठार मारण्याचा कट रचल्याची तक्रार भाजप आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत बंधू अभिजीत तायडे यांनी केली असून, याप्रकरणी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यासह तिघांविरुद्ध अमरावती ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विधानसभा निवडणुकीत प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांचा पराभव केल्याच्या रागातून हा कट आखल्याचा गंभीर आरोप तायडे यांनी आपल्या तक्रारीत केला असून, या घटनेमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांना राजकीयदृष्ट्या कमकुवत करण्यासाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी त्यांच्या चुलत बंधूंना, म्हणजेच अभिजीत तायडे यांना अपघाताचा बनाव करून जीवे मारण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मतदारसंघात जनसंपर्क वाढवण्यासाठी सक्रिय असलेल्या ४० वर्षीय अभिजीत तायडे यांनी यासंदर्भात लेखी तक्रार दिली असून, राजकीय वैमनस्यातून आपल्याला संपवण्याचा हा प्रयत्न असल्याचा दावा तायडे बंधूंनी या तक्रारीत केला आहे.

● छत्रपती संभाजीनगर ● वर्ष : २ रे ● अंक : २०५ ● रविवार दि.५ एप्रिल २०२६ ● किंमत ५.०० रू ● पाने : ०४ ● nilepratik02@gmail.com ● दैनिक

# आंबेडकरी उद्योजक गोल्डमॅन रोहित पिसाळ यांच्यावर जीवघेणा हल्ला

## थोडक्यात बचावले, चालक जखमी, समाजात संतापाची लाट




**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**

**पालघर :** आंबेडकरी तरुण उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते गोल्डमॅन रोहित पिसाळ यांच्यावर शुक्रवारी रात्री साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास जीवघेणा हल्ला झाला. पालघर येथील त्यांच्या अनाथ आश्रमावरून परतत असताना अंधारात दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्या वाहनावर तुफान दगडफेक केली. या अचानक झालेल्या हल्ल्यात रोहित पिसाळ थोडक्यात बचावले असून त्यांचे चालक जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, रोहित पिसाळ यांची गाडी वळणावर वळत असताना अंधाराचा फायदा घेत दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी अचानक दगडफेक सुरू केली. या हल्ल्यामुळे वाहनाचे नुकसान झाले असून चालक जखमी झाला. सुदैवाने रोहित पिसाळ यांना कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही.

हा हल्ला पूर्वनियोजित असल्याचा आरोप रोहित पिसाळ यांनी केला आहे. माझ्या हालचालींवर लक्ष ठेवून हा भ्याड हल्ला करण्यात आला आहे. यापूर्वीही माझ्यावर अशा प्रकारचे प्रयत्न झाले आहेत. समाजासाठी करत असलेले काम, नवतरुण घडवण्याचा संकल्प आणि महाराष्ट्रभर सुरू असलेली सामाजिक चळवळ काहींना खटकत असावी. सर्वांना समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करत असलो तरी काही विघ्नसंतोषी समाजकंटकांनी हा हल्ला घडवून आणल्याची शक्यता आहे, असे त्यांनी सांगितले.

हल्ला ज्या ठिकाणी झाला त्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याची माहिती हल्लेखोरांना आधीपासूनच असावी, म्हणूनच त्यांनी ही जागा निवडली असावी, असा संशयही व्यक्त केला जात आहे.या घटनेनंतर पोलीस तपास सुरू झाला असला तरी आपण तपासावर समाधानी नसून पोलीस आयुक्तांची भेट घेणार असल्याचे रोहित पिसाळ यांनी स्पष्ट केले. अशा हल्ल्यांनी मी खचणार नाही. अधिक ताकदीने समाजकार्यात झोकून देणार आहे. ही लढाई आपण कायदेशीर मार्गाने लढूया, असे आवाहन त्यांनी समाजाला केले.दरम्यान, या घटनेनंतर राज्यभरातून रोहित पिसाळ यांना मोठ्या प्रमाणात फोन व संदेश येत असून समाजबांधवांनी त्यांना पाठिंबा दर्शविला आहे. या हल्ल्यामुळे आंबेडकरी समाजात संतापाची लाट उसळली असून हल्लेखोरांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी तसेच रोहित पिसाळ यांना पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.गोल्डमॅन रोहित पिसाळ यांच्यावर झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यामुळे सामाजिक क्षेत्रात खळबळ उडाली असून या प्रकरणाकडे राज्याचे लक्ष लागले आहे.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक डीजे-मुक्त करण्याची मागणी

## सर्वधर्मसमभाव जयंती उत्सव महासंघाचे पोलीस आयुक्तांना निवेदन

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त निघणारी मिरवणूक डीजे-मुक्त करण्यात यावी, तसेच यापुढे कोणत्याही महापुरुषांच्या जयंतीत डीजेवर कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी, अशी मागणी सर्वधर्मसमभाव जयंती उत्सव महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शहराचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांना निवेदन देण्यात आले.महासंघाच्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात जयंती मिरवणुकीदरम्यान डीजेमुळे होणारा गोंधळ, ध्वनीप्रदूषण, तसेच बेशिस्त वर्तनामुळे निर्माण होणाऱ्या समस्या याकडे लक्ष वेधण्यात आले. विशेषतः मिरवणुकीदरम्यान काही ठिकाणी महिला व मुलींना छेडछाड करण्याचे प्रकार घडत असल्याचे नमूद करून अशा प्रकारांवर कठोर नियंत्रण ठेवण्याची मागणी करण्यात आली. तसेच मिरवणुकीदरम्यान



मद्यपान करणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली.

पोलीस प्रशासनाच्या वतीने नवले साहेब यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी त्यांनी डीजेवर बंदी घालण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.याशिवाय, या वर्षीच्या मिरवणुकीसाठी नेहमीपेक्षा वेळ वाढवून देण्यात यावी, अशी मागणीही शिष्टमंडळाने केली. मिरवणूक शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहात पार पडावी, यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी अपेक्षा महासंघाने व्यक्त केली.या शिष्टमंडळात ॲड. नरहरी कांबळे, मधुकरराव भोळे, श्रीरंग ससाणे, ज्ञानेश्वर खंदारे, राजपाल सौदे, भीमसेन कांबळे, शेख शरीफ आदींचा समावेश होता.महापुरुषांच्या जयंती साजरी करताना शिस्त, सामाजिक भान आणि संस्कार जपले जावेत, या उद्देशाने ही मागणी करण्यात आल्याचे महासंघाने स्पष्ट केले.

# करजगांव येथे वीज पडून शेतकऱ्याची दुभती गाय ठार!

## तलाठी आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांनी केला पंचनामा

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**भोकरदन । प्रतिनिधी**

बोरशे गुरुजी कर्म देते दैव नेते अशी गत करजगांव येथील शेतकऱ्यांची झाली आहे. सध्या सुरू असलेल्या अवकाळी पावसामध्ये गारपीट आणि विजेच्या तडाखा चालू आहे. यामध्ये करजगांव येथील परमेश्वर संतोषराव लोखंडे तालुका भोकरदन जिल्हा जालना यांची संकरित गाय वीज पडुन ठारझाली आहे.त्यामध्ये त्यांचे दीड लाखाचे नुकसान झाले आहे. अतिशय हालाखीच्या परिस्थितीमध्ये जगणाऱ्या शेतकऱ्यांनी व्याजाने पैसे काढून गाय घेतली होती.मोल मजुरी करून संसाराला पुरेसं हातभार लागत नसल्याने संकरित गायीच्या दुधाचा व्यवसाय करून दोन पैसे मिळतील या आशेवर इकडून तिकडून व्याजाने पैसे जमा करून गाय घेऊन दोन पैसे मिळवण्याचे स्वप्न या शेतकऱ्याने



पाहिले होते. परंतु नियतीला ते मान्य नव्हते सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अवकाळी पावसाने थैमान घातले आहे त्याचा तडाखा भोकरदन तालुक्यातील करजगांव आणि परिसराला बसला असून वीज पडुन गाय ठार झाली आणि या बिचाऱ्या शेतकऱ्यांचे स्वप्न धुळीला मिळाले आहे.आशेचा किरण म्हणून शासनाकडून मिळणारी आपत्ती बाबत शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची अपेक्षा असून मुर्तड सजाला असणाऱ्या तलाठी दाहीजे मॅडम आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ आर. वि.केळोदे व डॉ.ज्ञानेश्वर जगताप जळगाव सपकाळ यांनी जायमोक्यावर हजर राहुन पंचनामा केला आहे. माननीय जिल्हाधिकारी यांच्या कडुन जालना यांच्या कडुन सकारात्मक विचार करून संबंधित शेतकऱ्याला शासकीय मदत मिळवून दिल्या जाईल ही अपेक्षा आहे पंचनामा करतेवेळी त्यांच्या शेजारी शेतकरी श्रीमान हरीभाऊ विठ्ठल नरवाडे, श्री रमेश दौलतराव लक्कस,श्री कल्याण शेषराव लोखंडे, श्री भागवत रतन नरवाडे, सचिन समाधान लोखंडे यांच्यासह गावकरी हजर होते. या शेतकऱ्याला मदत मिळवून देण्यासाठी आम आदमी पार्टी पाठपुरावा करणार असल्याचे बोरशे गुरुजींनी कळविले आहे.

## नांदेड हादरले ! गँगवॉरमधून तिहेरी खून; रुग्णालयातही रक्तरंजित सूडनाट्य

# ई-स्केअर परिसरातील हाणामारीत दोघांचा मृत्यू;काही तासांतच रुग्णालयात घुसून तिसऱ्याची हत्या,शहरात दहशतीचे वातावरण

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**नांदेड । प्रतिनिधी**

कॅनाल रोडवर असलेल्या इ स्केअर सिनेमागृहात 'धुरंदर' चित्रपट पाहून परतणाऱ्या युवकांवर मध्यरात्री भीषण हल्ला करण्यात आला. रात्री साधारण १.३० ते २.०० वाजण्याच्या दरम्यान कॅनल रोड परिसरात घडलेल्या या रक्तरंजित घटनेत तीन तरुणांनी आपला जीव गमावला, तर तीन कुटुंबांवर कायमचा दुःखाचा डोंगर कोसळला.पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुस अरिजीत सिंग गजानन चव्हाण आपल्या मित्रांसोबत दुचाकीवरूनसिनेमागृहातून बाहेर पडत असताना त्याच्या हालचालींची माहिती विरोधी गटाला मिळाली होती. चित्रपट संपेपर्यंत दबा धरून बसलेल्या आरोपींनी बाहेर पडताच तलवारी व धारदार शस्त्रांनी हल्ला चढवला.

या हल्ल्यात सय्यद आवेज सय्यद खलील (२७), मोहम्मद अरबाज मोहम्मद फारूक (२३) यांच्यासह इतरांनी सहभाग घेतल्याचे सांगितले जाते. दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली. तलवारीच्या गंभीर वारांमुळे अरिजित सिंग चव्हाण याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. प्रतिकार करताना सय्यद आवेज याचाही मृत्यू झाला.दरम्यान जखमी अवस्थेत असलेल्या मोहम्मद अरबाज मोहम्मद फारूक याला उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले मात्र संतापाच्या भरात अर्जित सिंगच भाऊ प्रदीप चव्हाण दवाखान्यात पोहो आणि तेथेच अरबाजवर चाकूने हल्लाकेला. या हल्ल्यात अरबाजचाही मृत्यू झाला.

एका रात्रीत तीन मृतदेह... आणि तीन उद्ध्वस्त कुटुंबे. भाग्यनगर पोलिसांनी या प्रकरणात गँग विरुद्ध गँग असा उल्लेख करत दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. अर्जित सिंगची स्वतःची गंग तर विरोधी गट अनिल पंजाबी यांच्याशी संबंधित असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. अर्जित सिंगची आई अनिता गजानन चव्हाण यांच्या तक्रारीवरून पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून साई, अभिषेक, शाहरुख उर्फ कबूतर यांच्यासह इतर संशयितांचा पोलीस शोध घेत आहेत.

वय २३ ते २७ – स्वप्न पाहायचं वर 'भाई' बनायचं? मृत्यू पावलेल्या तिन्ही युवकांचे वय २३ ते २७ या दरम्यान.

हे वय असतं करिअर घडवण्याचं, आई-वडिलांचे कष्ट फेडण्याचं, घर उभं करण्याचं.

पण इथे काय घडलं?

कोणी इंजिनिअर व्हायचं स्वप्न पाहिलं नाही...

कोणी अधिकारी होण्याचा विचार केला नाही...

सगळ्यांना फक्त भाई लवकर व्हायचं होतं.

चित्रपटातील डायलॉग, सोशल मीडियावरील रील्स आणि स्थानिक दादागिरी यांचं मिश्रण झालं की वास्तव आयुष्य किती भयावह बनतं याचं हे जिवंत उदाहरण आहे



संपादकीय

# हवे हिरवे छत्र

शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाच्या शर्यतीत शहरी वृक्षसंपत्तीचे महत्त्व वारंवार दुर्लक्षित केले जात आहे. प्रत्यक्षात झाडे ही केवळ सौंदर्य नव्हे, तर पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेची अत्यावश्यक पायाभूत सुविधा आहेत.असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच–त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो.भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच ’विकास’ आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे. आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष–प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे. एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे.मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बोरिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का? सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे.जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे पण पुरेसे नाही. भारतीय शहरांचा झाडांशी असलेला संबंध बदलण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप हवा, आणि तो तातडीने हवा. रोपटे लावणे म्हणजे प्रौढ झाड जतन करणे नव्हे. शंभर रोपटी एका ८०–वर्षांच्या वटवृक्षाची जागा घेत नाहीत. हा फरक धोरणात रुजवायला हवा. कॉर्पोरेट भारतालाही यात भूमिका आहे. खऱ्या अर्थाने सार्थक ईएसजी बांधिलकीमध्ये प्रकल्प स्थळांवर आर्बोरिकल्चरल कसोशीचा समावेश होतो. टिकाऊपणाबद्दल गंभीर असलेल्या कंपन्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी व्यावसायिक वृक्ष–प्रभाव मूल्यांकन करवून घ्यायला हवे. काम झाल्यावर गच्चीवर रोपटे लावणे हे ग्रीनवॉशिंग आहे.अनावश्यक तोडण्यात येणारी झाडे, चुकीच्या छाटणीने खालावणारे छत्र, अज्ञानी बांधकाम प्रथांमुळे मरणारे वारसा वृक्ष आणि अधिकाधिक गरम, गोंगाटमय आणि श्वास घेणे कठीण होत जाणारी शहरांची सध्याची परिस्थिती आहे. यावर कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे. अशी शहरे जिथे शतावर्षीय वटवृक्ष शाळेसाठी अडथळा नसतो, तर ती सर्वात मौल्यवान संपत्ती असते. शहरे वाढत राहणार आहेत. पण ती वाढ झाडांच्या विरोधात नसून त्यांच्या सहजीवनातून व्हायला हवी. ‘वाढती शहरे, हिरवे छत्र’ ही केवळ घोषणा नाही; ती भविष्यातील शहरांची रचना आहे. अशी शहरे जिथे पायाभूत सुविधा प्रकल्पांचा पहिला प्रश्न कोणती झाडे काढायची? असा नसून कोणती झाडे वाचवता येतील? असा असेल. मुंबई या बदलाचे नेतृत्व करू शकते आणि करायलाच हवे.

# सत्तेचे समीकरण,उद्योगसत्ता आणि संसद राघव चड्ढा प्रकरणाचा खरा अर्थ

भारतीय लोकशाहीच्या मंदिरात अर्थात संसदेत उठणारा प्रत्येक आवाज हा केवळ एका व्यक्तीचा नसतो; तो त्या समाजाच्या आशा, आकांक्षा आणि प्रश्नांचा प्रतिनिधी असतो. पण जेव्हा हा आवाज सत्तेच्या आणि उद्योगसत्तेच्या संगनमताला स्पर्श करतो, तेव्हा त्याचे परिणाम केवळ राजकीय न राहता व्यापक स्वरूप धारण करतात. अलीकडील काळात राघव चड्ढा यांच्या संदर्भात घडलेली घटना याच वास्तवाचे एक ठळक उदाहरण म्हणून समोर येते. राघव चड्ढा यांनी संसदेत दोन महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. हे मुद्दे वरकरणी सामान्य वाटले तरी त्यांच्या परिणामांची व्याप्ती मोठी होती. कारण हे प्रश्न थेट त्या क्षेत्रांशी संबंधित होते, जिथे देशातील प्रभावशाली उद्योगसमूहांचे मोठे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही तो अधिकार आहे. पण हा अधिकार जेव्हा ‘अस्वस्थ’ करणाऱ्या प्रश्नांमध्ये बदलतो, तेव्हा सत्ताधाऱ्यांच्या भुवया उंचावतात. चड्ढा यांच्या बाबतीतही काहीसे असेच झाले का, हा प्रश्न आज सामान्य नागरिकांच्या मनात उभा राहतो.

भारतीय अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर उद्योगसमूहांवर आधारित आहे. या उद्योगसमूहांचे योगदान देशाच्या विकासात नाकारता येणार नाही. मात्र, त्याचवेळी राजकारण आणि उद्योग यांच्यातील नाते किती पारदर्शक आहे, हा प्रश्न कायमच उपस्थित राहतो. जेव्हा एखादा लोकप्रतिनिधी अशा मुद्द्यांवर बोट ठेवतो, जे थेट उद्योगसमूहांच्या नफ्यावर परिणाम करू शकतात, तेव्हा त्या आवाजाला ‘नियंत्रित’ करण्याचा प्रयत्न होतो का? चड्ढा यांच्या प्रकरणाने हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे आणला आहे. राघव चड्ढा यांनी केलेली ‘चूक’ नेमकी काय होती?




त्यांनी नियमांचे उल्लंघन केले का, की त्यांनी ‘न बोलण्याच्या’ गोष्टी बोलण्याचे धाडस केले? सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने ती चूक असू शकते, पण लोकशाहीच्या दृष्टीने ते धाडस ठरते. कारण लोकशाही केवळ बहुमतावर चालत नाही; ती विरोधाच्या आवाजावरही तितकीच अवलंबून असते. जर विरोधकांनी प्रश्न विचारणे थांबवले, तर संसद केवळ एक औपचारिक संस्था उरते. त्यामुळे, चड्ढा यांच्या कृतीकडे केवळ ‘शिस्तभंग’ म्हणून पाहणे ही एकांगी भूमिका ठरेल. संसद ही नियमांनी चालणारी संस्था आहे. त्या नियमांचे पालन करणे प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे. मात्र, हे नियम कधी कधी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यासाठी वापरले जातात का, हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. चड्ढा यांच्यावर झालेली कारवाई ही केवळ नियमांचे पालन न केल्यामुळे झाली, की त्यामागे काही राजकीय आणि आर्थिक हितसंबंध होते? या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे समोर येत नसले, तरी शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. आजच्या राजकीय वातावरणात ‘अनुकूल’ आवाजांना प्रोत्साहन आणि ‘प्रतिकूल’ आवाजांना मर्यादा घालण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. हे केवळ एका पक्षापुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेचे एक चिंताजनक चित्र आहे. जर लोकशाहीत केवळ ‘होय’ म्हणणारेच टिकून राहतील, तर ‘नाही’ म्हणणाऱ्यांचे काय? चड्ढा यांचे प्रकरण या प्रश्नाला अधिक धारदार बनवते. या संपूर्ण प्रकरणात माध्यमांची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे. काही माध्यमांनी या घटनेकडे केवळ एक ‘विवाद’ म्हणून पाहिले, तर काहींनी त्यामागील व्यापक संदर्भ मांडण्याचा प्रयत्न केला. माध्यमांनी केवळ घटनांची माहिती देणे पुरेसे नाही; त्यामागील सत्य उलगडणेही तितकेच आवश्यक आहे.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

अन्यथा, लोकशाहीचा ‘आरसा’ हा ‘मुखवटा’ बनण्याचा धोका निर्माण होतो. या सर्व घडामोडींमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका ही जनतेची आहे. जर जनता केवळ प्रेक्षक राहिली, तर अशा घटना वारंवार घडत राहतील. पण जर जनता सजग झाली, प्रश्न विचारू लागली, तर सत्ताधाऱ्यांनाही उत्तर द्यावे लागेल. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते; ती सतत जागरूक राहण्याची प्रक्रिया आहे.

राघव चड्ढा प्रकरणातून काही महत्त्वाचे धडे समोर येतात:

लोकशाहीत प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे.

उद्योगसत्ता आणि राजकारण यांच्यातील नाते अधिक पारदर्शक असावे.

संसद ही केवळ नियमांची नव्हे, तर विचारांचीही जागा आहे.

माध्यमांनी निष्पक्ष आणि सखोल विश्लेषण करणे आवश्यक आहे.

इतिहास सांगतो ज्या आवाजांना दाबण्याचा प्रयत्न केला जातो, ते आवाज अधिक ताकदीने परत येतात. राघव चड्ढा यांचे प्रकरण हे केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नाही; ते लोकशाहीच्या आरोग्याशी संबंधित आहे. जर लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्यांना ‘गेट आऊट’ केले जाईल, तर उद्या कोणताही सामान्य नागरिक आपला आवाज कसा उठवेल? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नाही, तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आज गरज आहे ती ‘धाडस’ आणि ‘संवाद’ यांची. कारण लोकशाही ही केवळ सत्तेची नाही, तर सत्याचीही असते. प्रश्न विचारणारा समाजच खऱ्या अर्थाने जिवंत असतो. आणि तो जिवंतपणा टिकवून ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगातील आदर्श महापुरुष

ब्रिटीश मंत्रिमंडळात मजूरमंत्री असताना बाबासाहेबांनी अनेक महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. काम करण्याची त्यांची धडाडी पाहून त्यावेळच्या भारताच्या सेनापतींनी आश्चर्य व्यक्त केले. कर्तृत्ववान, कार्यक्षम व ध्येयनिष्ठ मजूरमंत्री म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला.

मध्यवर्ती सरकारचे बांधकाम खातेही त्यांच्याकडे होते. भारतातील अनेक विमानतळे त्यांच्याच कारकीर्दीत बांधून झाली.

मजुरांच्या व स्त्रियांच्या भल्यासाठी महत्त्वाचे कायदे त्यांच्याच कारकीर्दीत मंजूर झाले. नोकरभरतीसाठी सेवायोजन कार्यालयांची निर्मिती, मजुरांची गाऱ्हाणी व प्रश्न सोडविण्याकरिता कामगार आधिकाऱ्यांची नेमणूक, सरकार, कामगार व मालक

यांचे त्रिपक्षीय मंडळ, कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना युद्धकाळात काही नुकसान झाल्यास मालकाकडून नुकसानभरपाई मिळण्याची सोय, कारखान्यातील कामगारांना सात दिवसांची पगारी रजा मिळण्याची सोय, खाणीतील कामगार खियांना बाळंतपणासाठी पगारी रजा मिळण्याची सोय इ. अनेक सुधारणा बाबासाहेबांनी घडवून आणल्या. चहामळ्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी ’इंडियन टी कंट्रोल बिल’ मंजूर करून घेतले. मजुरांसाठी दहा तासांऐवजी आठ तासांचा दिवस करणारे महत्त्वाचे विधेयक पास करून घेऊन त्यांनी कामगारांच्या जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणला.

मजुरांच्या समस्या जाणून घेण्याची बाबासाहेबांची पद्धत जगावेगळी होती. ते स्वतः अनेक वर्षे मजुरांच्या वस्त्यांतून राहिले. त्यामुळे त्यांना, मजुरांच्या प्रश्नांची जाणीव होतीच. मजूर मंत्री या नात्याने अनेक कापड गिरण्यांची, खाणींची व चहामळ्यांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली व त्यानंतरच कामगार–कल्याणविषयक कायदे मंजूर करून घेतले.

एकदा ते धनबादच्या खाणीत स्वतः सुरक्षा टोपी घालून आपल्या अधिकाऱ्यांसोबत चारशे फूट खोल उत्तरले. बाहेर आल्यावर कोळशाचा ढीग करणाऱ्या कामगारांची त्यांनी चौकशी केली. त्यांच्या वसाहतीला भेट दिली. एका कामगाराच्या घरात प्रवेश करून तेथील राहणीमान त्यांनी पाहिले. खाण–मालकांनी चालवलेल्या इस्पितळात जाऊन त्यांनी रुग्णांची चौकशी केली. महिलांच्या वार्डलाही त्यांनी भेट दिली. मजूर स्त्रियांच्या मुलांकरिता चालवलेल्या पाळणाघरांची व शाळांचीही जातीने पाहणी करून दुर्बल मुलांच्या प्रकृतीकडे लक्ष देण्यास त्यांनी सुचवले.

दामोदर धरण योजनेसंबंधी त्यांनी केलेले कार्य तर पूर्व भारताचा चेहरामोहराच बदलून टाकणारे आहे.एक काळ असा होता की, दामोदर नदी म्हणजे बिहारचे संकट समजले जाई. दर दोन–चार वर्षांनी नदीला महापूर येत असे. त्यामुळे लाखो लोकांचे जीवन धोक्यात येत असे. १८५९ पासून बारा महापूर जनतेने पाहिले. परंतु, १७ जुलै, १९४३ रोजी आलेल्या पुराने मात्र सर्व उच्चांक मोडले.सत्तर गावे नष्ट झाली. अकरा हजार घरे वाहून गेली. लाखो लोक बेघर झाले. दामोदर नदीच्या पुराने बंगालशी संपूर्ण भारताचा संबंध तोडला. अन्नधान्य पोचणे कठीण झाले. त्यातच जपानी सैन्य कलकत्त्यापर्यंत बॉम्बवर्षाव करीत होते. सर्वत्र गोंधळ निर्माण झाला होता.

याच सुमारास बंगालमध्ये दुष्काळाने कहर केला. सुमारे पंचवीस हजार लोक मरण पावले. लक्षावधी लोक अपंग झाले.

अशावेळी दामोदर नदीला आटोक्यात आणणारी कायमची योजना तयार करण्याचा भारत सरकारने विचार केला. भारतात हे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे सोपवण्यात आले.

दामोदर खोरे योजना ही गोरगरिबांचे कल्याण करणारी योजना व्हावी, असे बाबासाहेबांना वाटले, अमेरिकेतील टेनेसी नदी अनेक प्रांतांतून वाहत जाते. एके मानवी सेवेकरिता उपयोग करून घेतला, त्याच धर्तीवर दामोदर नदीचाही वापर काळी तिच्या पुरामुळे लोक हवालदिल झाले होते. तिचा ज्याप्रमाणे अमेरिकन जनतेने करता येईल, असे त्यांना वाटले. त्यांनी टेनेसी नदीच्या योजनेचे अनेक ग्रंथ मागवून घेतले. आपल्या खात्यातील नोकरशहांवर अवलंबून राहणे बाबासाहेबांच्या स्वभावातच नव्हते. टेनेसी योजनेप्रमाणे भारतातील म्हैसूर येथील तुंगभद्रा व भारतातील छोट्या मोठ्या धरणांचाही त्यांनी अभ्यास केला.

दामोदर योजना राबविण्यासाठी एक अनुभवी व हुशार तंत्रज्ञ हवा होता. इजिप्तमध्ये आस्वान धरणावर काम करणाऱ्या ब्रिटीश इंजिनियरला हे काम द्यावे, असे व्हॉईसरॉय वेव्हेल यांचे मत होते. बाबासाहेबांनी त्यांना स्पष्टच सांगितले,

इंग्लंडमध्ये भारतासारख्या विस्तीर्ण अशा नद्या नाहीत. तेथील तंत्रज्ञांना अशा मोठ्या नद्यांवर धरणे बांधण्याचा अनुभव नाही. त्यापेक्षा अशा कामावर अमेरिकन तंत्रज्ञच उपयुक्त आहेत.

आपले म्हणणे त्यांनी ब्रिटीश सरकारला मान्य करण्यास भाग पाडले. अमेरिकेतील टेनेसी योजनेवर असलेल्या वूरदुइन या इंजिनियरवर त्यांनी हे काम सोपवले.

अमेरिकन तंत्रज्ञाचे काम संपल्यावर केंद्रीय विद्युत मंडळ किंवा केंद्रीय जलसिंचन व जलमार्ग आयोगाचे काम पाहण्यासाठी लायक भारतीय व्यक्ती नेमणे आवश्यक होते. बाबासाहेबांना त्यासाठी निव्वळ भारतीय माणूसच हवा होता.

त्यावेळी रावबहादूर ए. ए. खोसला हे पंजाबमध्ये चीफ इंजिनियर या पदावर होते. त्यांचे मत डॉ. आंबेडकरांबद्दल कलुषित होते. त्यामुळे त्यांनी प्रथम काम करण्यास नकार दिला. बाबासाहेबांनी त्यांना भेटीस बोलावून म्हटले,

एखादा इंग्रज व अमेरिकन इंजिनियर नेमणे मला कठीण नाही. पण मला भारतीय तंत्रज्ञच हवा आहे.

बाबासाहेबांच्या या उद्गारांनी खोसलांचे डोळे उघडले. त्यांनी तात्काळ ते पद स्वीकारले.

याप्रकारे बाबासाहेबांनी दामोदर धरण योजना जन्माला घातली. अत्यंत परिश्रम घेऊन ती कार्यान्वित केली. पण योजना पूर्ण होण्याच्या आतच देशात विभाजनाची खळबळ माजली.

पुढे ही योजना स्वातंत्र्यानंतर काकासाहेब गाडगीळ यांनी पूर्ण करवून घेतली. असे या भारत देशावर डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे अनंत उपकार आहेत . डॉ . बाबासाहेब आंबेडकर हे कुण्या जाती धर्मासाठी झिजले नाहीत तर भारत राष्ट्र आणि शरतीय समाज यासाठी त्यांनी त्यांची हयात घालविली . भारत देशातीलच नाही तर संपूर्ण जगाला डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श महापुरुष आहेत .

**–ज्येष्ठ साहित्यिक त.दा.गंगावणे**

# कोप्रोली ग्रामस्थांनी काळे पिवळे मार्किंग पट्टे जाळून एमएमआरडीए व राज्य सरकारचा केला निषेध

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मुंबई । प्रतिनिधी**

एमएमआरडीएने उरण तालुक्यातील कोप्रोली गावच्या वेशीवर काळे पिवळे चौकटीत मार्किंगला केले होते. गुरुवार दिनांक २.४.२०२६ रोजी कोप्रोली ग्रामस्थ व सर्व पक्षांचे प्रमुख कार्यकर्त्यांनी एकत्र येत या मार्किंगला काळे फासून निषेध केला. उपस्थितांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा तीव्र निषेध करत या मार्किंगवर टायर जाळून सरकार आणि एमएमआरडीएला इशारा दिला आहे.

जमीन, घर आणि गाव वाचवा
एमएमआरडीए हटवा
जमीन आमच्या हक्काची
नाही कुणाच्या बापाची

असे नारे देत शेती घरे आणि गाव वाचवण्यासाठी ग्रामस्थांनी एल्गार केला आहे. तत्पूर्वी एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समितीचे सरचिटणीस रुपेश पाटील यांनी सरकारने तिसऱ्या



मुंबईसाठी जाहीर केलेल्या भूसंपादनाच्या शासन निर्णयाची माहिती दिली. सरकारचे धोरण फसवे आणि शेतकरी विरोधी असून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याला बळी पडू नये. आपण संघटीत राहून संघर्ष केला नाही तर भविष्यात आपली मूळ गावठाणाबाहेरील घरेही बेकायदेशीर ठरतील. सरकारने या सर्व घरांना सनद ( प्रॉपर्टी कार्ड ) देऊन सुरक्षित करावे तसेच मूळ गावठाणाबाहेर ५०० मिटर पर्यंत गावठाण क्षेत्र जाहीर करावे. एमएमआरडीएने गावोगावी अशा प्रकारचे मार्किंग करून हद्दी निश्चित करत बेकायदेशीरपणे सर्वेक्षण सुरू केलं आहे. त्याला सर्वत्र विरोध होत आहे. याप्रसंगी समितीचे उपाध्यक्ष चंद्रशेखर ठाकूर, एड. पर्जन्य म्हात्रे, विपुल म्हात्रे, शशिकांत पाटील, प्रवीण म्हात्रे, अमेय पितळे, दिलीप म्हात्रे, हितेश म्हात्रे, अमृत म्हात्रे, निलेश म्हात्रे, धनेश म्हात्रे, अनिकेत ठाकूर, ओमकार गावंड, हर्षद पाटील, ओंकार म्हात्रे, सौरव पाटील, नमोद म्हात्रे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरूण भारत मिडिया लि., प्लॉट नं. १/३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को. ऑप सोसायटी लि. एमआयडीसी, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र– ४३१००१) येथे छापून एफ–४/ १४, अयोध्या नगर, एन –७, सिडको छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र– ४३१००१) येथे प्रसिद्ध केले. ✻ संपादक : रतन नामदेव साळवे, मो. ९९२३५०२३२०, E-nilepratik02@gmail.com

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी : यंदाचा निकाल १००%

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उच्च गुण मिळवत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. काही विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या परीक्षेत महाविद्यालयाचा अंतिम वर्षाचा निकाल १००%, तृतीय वर्षाचा निकालही १००%, आणि द्वितीय वर्षाचा निकाल ९०% लागला आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, नियमित अभ्यास आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

गुणवंत विद्यार्थ्यांची यादी खालील प्रमाणे आहे

बीपीटी अंतिम वर्ष ( १००% निकाल )
प्रथम क्रमांक श्रावस्ती जगताप = ६२%
द्वितीय क्रमांक शामल चव्हाण = ६१.५%
तृतीय क्रमांक मनीषा होके = ५७.८७%

बीपीटी तृतीय वर्ष ( १००% निकाल )
प्रथम क्रमांक अलिशा काटे = ६६%
द्वितीय क्रमांक श्रुती उन्हाळे = ६५.२%
तृतीय क्रमांक मानसी जोंधळे = ६४.८%

बीपीटी द्वितीय वर्ष ( ९०% निकाल)
प्रथम क्रमांक यशराज पाटील = ६०%
द्वितीय क्रमांक अमन शेख = ५९.८५%
तृतीय क्रमांक राहुल पवार = ५९.४२%


महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, भविष्यातही असेच यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे अग्रगण्य संस्थान म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



# अवकाळी पावसात बीड बस स्थानकाची पोल खोल; कोट्यवधींच्या कामात निकृष्ट दर्जा उघड

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बस स्थानकाच्या विकासकामावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही कामाचा निकृष्ट दर्जा समोर आला आहे. अवकाळी पावसाच्या पहिल्याच तडाख्यात बस स्थानकाच्या छताला गळती लागल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.अद्याप काम पूर्णत्वास गेले नसतानाच जे बांधकाम पूर्ण झाले आहे, त्याची गुणवत्ता अत्यंत खराब असल्याचे स्पष्ट होत आहे. आज झालेल्या अवकाळी पावसामुळे बस स्थानकाच्या छतामधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळत असून प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



विशेष म्हणजे, या कामावर कोट्यवधींचा खर्च करण्यात आला असूनही एका पावसातच बांधकामाची पोलखोल झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित काम पूर्ण होऊन वर्षही उलटलेले नसताना अशी अवस्था निर्माण झाल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, या प्रकरणी संबंधित कंत्राटदारावर कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. जिल्हा प्रशासन याबाबत काय भूमिका घेणार, दोषींवर कारवाई होईल की प्रकरण दाबले जाईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# युसुफवडगाव येथे रात्री तून महात्मा बसवेश्वरांचा अश्वारूढ पुतळा उभारला,अज्ञातांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसुफवडगाव येथे ग्रामपंचायत कार्यालया समोर रात्रीतून अज्ञात कार्यकर्त्यांनी महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारूढ पुतळ्याची उभारणी केल्या प्रकरणी ग्राम पंचायत अधिकारी प्रदीप नखाते यांच्या फिर्यादी वरून अज्ञात इसमां विरुद्ध युसूफवडगाव पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




युसुफवडगाव येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर अज्ञात लोकांनी महात्मा बसवेश्वर यांच्या पाच ते सहा फुट उंचीच्या अश्वारूढ पुतळ्याची उभारणी केल्याचे निदर्शनास आले.पुतळा उभारण्यापूर्वी यालोकांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाची परवानगी न घेता हा पुतळा त्यांच्या मालकीच्या जागेत उभारल्याचे स्पष्ट झाले. गावातील सरपंच,ग्राम पंचायतचे सदस्य यांच्या कडे विचारणा केली असता त्यांनी कोणी पुतळा उभा केला,याची माहिती नसल्याचे सांगितले.तर पुतळ्याचे पावित्र्य न राखता व सुरक्षेची काळजी न घेता पुतळाउभारणी केल्याची फिर्याद सोमवार दि.३१ मार्च रोजी ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप नखाते यांनी दिल्यावरून अज्ञात व्यक्तिविरुद्ध युसूफ वडगांव पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार सीताराम डोंगरे हे पुढील तपास करीत आहेत.

# जांभीपाणीपाडा हादरले! किरकोळ वादातून तरुणाला खांबाला बांधून मारहाण; निर्घृण हत्या

## अक्कलकुवा तालुक्यातील संतापजनक प्रकार; कायद्याला धाब्यावर बसवून जमावाचा हिंसक अवतार

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मोलगी । प्रतिनिधी**

प्रेक्षकहो! माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना अक्कलकुवा तालुक्यातील डाबचा जांभीपाणीपाडा येथे घडली आहे. केवळ घरात घुसून मारहाण केल्याच्या संशयावरून, एका ४४ वर्षीय व्यक्तीला घराच्या सिमेंटच्या खांबाला दोरीने बांधून लाकडी काठ्यांनी बेदम मारहाण करत त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यात खळबळ उडाली असून कायद्याचा धाक उरला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मयत महेंद्र हात्या वसावे (राहणार सोराचापडा, मोलगी) हे १ एप्रिलच्या पहाटे ३ वाजेच्या सुमारास आरोपी बामण्या पाश्या राऊत यांच्या घरात गेले होते. तिथे त्यांनी गिमलीबाई राऊत यांना मारहाण केल्याचा राग मनात धरून, आरोपींनी कायद्याला हातात घेतले. महेंद्र वसावे यांना पकडून घराच्या सिमेंटच्या खांबाला दोराने बांधण्यात आले. असहाय्य अवस्थेत असलेल्या महेंद्र यांना चारही आरोपींनी लाकडी काठ्या आणि लाथाबुक्क्यांनी इतकी बेदम मारहाण केली की, त्यांचा जागीच मृत्यू झाला.




या प्रकरणी मयताची पत्नी लिलावाई वसावे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोलगी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) आणि ३(५) नुसार संशयित बामण्या पाश्या राऊत,. गिमलीबाई बामण्या राऊत, दिनेश बामण्या राऊत, सुरती बामण्या राऊत. यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सध्या पोलीस या आरोपींचा कसून शोध घेत आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक जयसिंग पावरा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक जयसिंग पावरा या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# जि.प.उ.प्रा.शा.कानडीमाळी येथे आनंदनगरी आनंदात संपन्न; विविध वस्तू विकत चिमुरड्यांनी घेतला आनंद


**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कानडी माळी या ठिकाणी आनंद नगरीमध्ये बाल चिमुकल्यांनी भरभरून सहभाग घेतला. आनंद नगरीच्या उद्घाटन प्रसंगी गावातील प्रतिष्ठित पालक श्री सुदाम राऊत,श्री जालिंदर राऊत, श्री ओमप्रकाश पटणे, माता पालक वर्ग,मुख्याध्यापक श्री गिरी सर, सहशिक्षक इंगळे सर ,श्रीमती जाधव मॅडम ,चाटे मॅडम, देशमुख मॅडम ,थाटकर मॅडम, शेलार मॅडम व घाडगे मॅडम तसेच शिक्षण प्रेमी ,पालक वर्ग, माजी विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद नगरीमध्ये विद्यार्थ्यांनी पॅटीस, पुरी भाजी ,वडापाव ,पावभाजी ,गुलाब जामुन ,विविध फळे ,भेळ ,चिंचा , कवठ, इडली, वडे, पाणीपुरी ,असे विविध पदार्थ बनवून आणले होते. प्रत्यक्षात पैशांचा व्यवहार कसा करावा, नफा तोटा



,आकडेमोड, पैसे मोड ,चिल्लर याचे प्रात्यक्षिक ज्ञान अगदी पहिलीपासूनच्या विद्यार्थ्यांनी आनंद नगरीतून घेतले. अशा पद्धतीने आनंदगरी उत्साहात पार पडली.

# केज तालुक्यात विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस



**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात सायंकाळी ५:०० वाजता विजेच्या कडकडासह अवकाळी पाऊस झाला.

दि. १ एप्रिल, बुधवार रोजी दुपारी ५:०० केज तालुक्यात पाऊस झाला. वारा आणि विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला. या अवकाळी अवकाळी पाऊस आणि वाऱ्याने आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले असून छोट्या कैऱ्या खाली पडून नुकसान झाले आहे. तसेच फळभाज्या आणि पालेभाज्या या पिकांना अवकाळी पाऊस व वाऱ्याने मोठा फटका बसल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पिके गेल्याने पुन्हा शेतकरी संकटात सापडला आहे.

# पनवेल–अलिबाग एसटी सेवा ठप्प रात्री प्रवाशांची गैरसोय वाढली

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**अलिबाग । प्रतिनिधी**

पनवेलहून अलिबाग, रेवदंडा, मुरुड आणि वडखळ या भागात जाणाऱ्या प्रवाशांना रात्री ८ ते ८.३० नंतर एसटी बस उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या वेळेनंतर नियमित बस सेवा थांबत असल्याने प्रवाशांना इतर अनियमित गाड्यांवर अवलंबून राहावे लागते. मुंबईहून कामानिमित्त येणाऱ्या चाकरमान्यांना रात्री उशिरा आल्यानंतर राहण्यासाठी लॉज शोधावी लागते किंवा एसटी स्थानकातच रात्र काढावी लागते. या समस्येमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सामाजिक कार्यकर्ते देवव्रत विष्णू पाटील यांनी सांगितले की, स्थानिक लोकप्रतिनिधी एसटीने प्रवास करत नसल्याने त्यांना नागरिकांच्या अडचणींची जाणीवच होत नाही.

**वडखळ प्रवाशांचे हाल; वाहतूक सुविधांची कमतरता**

रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे केंद्र असलेल्या वडखळ गावातही एसटी सेवेकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. रात्री ९ नंतर पनवेलहून वडखळकडे जाण्यासाठी अलिबाग मार्गाव्यतिरिक्त इतर बस थांबत नसल्याची तक्रार प्रवासी राजेश म्हात्रे यांनी केली आहे.

प्रवाशांनी विनंती करूनही अनेकदा कंडक्टर नकार देतात, तसेच काही बस स्थानकात थांबतच नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

**लोकप्रतिनिधींविषयी वाढती नाराजी**

या प्रश्नावर खासदार, आमदार किंवा जिल्हा परिषद सदस्यांकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे. निवडून दिलेल्या प्रतिनिधींना जाब विचारावा, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. देवव्रत पाटील यांनी वडखळ, अलिबाग, रेवदंडा आणि मुरुडसाठी अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करण्याची मागणी केली आहे.

**डेपो व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह**

पनवेल व अलिबाग एसटी डेपोच्या कामकाजावरही संशय व्यक्त केला जात आहे. खासगी वाहनचालक प्रवाशांकडून जादा भाडे (सुमारे ३०० रुपये) आकारून त्यांची लूट करत असल्याच्या तक्रारी आहेत. काही नागरिकांनी एसटी अधिकाऱ्यांसोबत संगनमत असल्याचाही आरोप केला आहे.

तसेच, डेपोमधील संपर्क क्रमांक कायम व्यस्त किंवा बंद असतात आणि अधिकाऱ्यांचे वर्तन उद्धट असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत.

**प्रवाशांच्या अपेक्षा वाढल्या; तातडीच्या उपाययोजनांची गरज**


शासनाकडून चांगल्या सेवांची अपेक्षा असताना प्रत्यक्षात एसटी सेवा कोलमडलेली दिसत आहे. चालक व कंडक्टरांची कमतरता, जुन्या बस आणि विस्कळीत वेळापत्रक यामुळे प्रवासी त्रस्त आहेत. रात्रीच्या अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करणे, वडखळ येथे बस थांबे वाढवणे आणि डेपोमधील गैरप्रकारांची चौकशी करणे, या मागण्या आता जोर धरत आहेत.

# मोहफूल संकलनाचा हंगाम सुरू; वन्य प्राण्यांच्या वाढत्या वावराने मजुरांचा जीव धोक्यात!

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**किनवट । प्रतिनिधी**

किनवट तालुक्यात वसंत ऋतूच्या सुरुवातीस मोहफूल संकलनाचा हंगाम सुरू झाला आहे. दिवाळीनंतर कामाच्या शोधात बाहेर गेलेले अनेक मजूर गुढीपाडव्याच्या सुमारास पुन्हा गावाकडे परतून या कामात गुंतले आहेत. जंगल परिसरात मोठ्या प्रमाणात मोह वृक्ष असल्यामुळे हा हंगाम ग्रामीण भागासाठी महत्त्वाचा रोजगाराचा स्रोत ठरतो.

थंड पहाटेच्या वातावरणात महिला, पुरुष तसेच वृद्ध नागरिक टोपल्या व पोती घेऊन जंगलात जाऊन झाडाखाली पडलेली मोहफुले गोळा करतात. ही फुले वाळवून बाजारात विकली जातात. स्थानिक तसेच बाहेरील बाजारपेठेत मोहफुलांना चांगली मागणी असल्याने अनेक कुटुंबांना यामधून आर्थिक दिलासा मिळतो.



मात्र, याच वेळी जंगलात वाघ, बिबट्या आणि अस्वल यांसारख्या वन्यप्राण्यांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पानगळ झाल्याने जंगल मोकळे दिसत असले तरी वन्यप्राणी सहज दिसत नाहीत, त्यामुळे हल्ल्याची शक्यता वाढते. यापूर्वीही काही नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

दरम्यान या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांकडून वन विभागाने मोहफूल संकलनाच्या काळात विशेष सुरक्षा उपाययोजना कराव्यात, वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा आणि संकलन करणाऱ्या नागरिकांना संरक्षण मिळावे, अशी मागणी ग्रामीण भागा जोर धरत आहे. एकूणच, वसंत ऋतूत सुरू होणारे मोहफूल संकलन हे ग्रामीण भागासाठी रोजगाराचा महत्त्वाचा स्रोत ठरत असले तरी त्याला सुरक्षिततेची जोड देणे काळाची गरज ठरत आहे. काही प्रमाणात का होईना, मजुरांना गावातच रोजगार उपलब्ध होतो पहाटेच्या थंड वातावरणात महिलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वजण टोपल्या, पोती घेऊन जंगलात जातात आणि झाडाखाली पडलेली फुले गोळा करतात. ही फुले नंतर स्वच्छ करून उन्हात वाळवली जातात आणि बाजारात विक्रीसाठी तयार केली जातात. मोहफूलाला स्थानिक तसेच बाहेरील बाजारपेठेत चांगली मागणी असून त्यापासून विविध उत्पादने तयार

केली जातात, त्यामुळे ग्रामीण कुटुंबांना यामधून काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळतो. किनवट, बोधडी, इस्लापूर, आप्पारावपेठ आणि मांडवी वनपरिक्षेत्रात वन्यप्राण्यांचा वावर जास्त असल्याने नागरिक भीतीच्या छायेत काम करत आहेत. उदरनिर्वाहासाठी दुसरा पर्याय नसल्याने ते जीव मुठीत धरून मोहफूल संकलन करत आहेत. या पार्श्वभूमीवर वन विभागाने विशेष सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. तसेच एकट्याने जंगलात न जाता समूहाने जावे व सतर्क राहावे, असे आवाहन वनक्षेत्रपाल प्रमोद राठोड यांनी केले आहे.

# स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलन २०२६ मोठ्या उत्साहात संपन्न

## अभिजीत दरेकर यांना द ग्रेट पत्रकारिता आयकॉन पुरस्कार प्रदान

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**रायगड । प्रतिनिधी**

आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलन २०२६ हा भव्य सोहळा शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी महाड तालुक्यातील नडगाव तर्फे बीरवाडी येथील हॉटेल फाउंटन इन (लिमोनेट लीला) येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला.

कर्तृत्वाचा गौरव... रायगडचा अभिमान! या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कर्जत येथील पत्रकार अभिजित नारायण दरेकर यांना 'द ग्रेट पत्रकारिता आयकॉन अवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला.

अभिजीत दरेकर यांनी पत्रकारिता क्षेत्रात प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि धाडसाने केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार सन्मान देण्यात आला. ग्रामीण भागातील प्रश्न, सामाजिक समस्या आणि जनतेच्या अडचणी प्रभावीपणे मांडत त्यांनी पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.या कार्यक्रमात मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेते अजय तपकिरे



यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. विनोदराव मोरे यांनी मार्गदर्शन करताना समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना अशा प्रकारच्या व्यासपीठातून प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमांना अभिवादन करून सुरुवात करण्यात आली. रायगडच्या ऐतिहासिक वारशाची परंपरा आणि स्वराज्य मूल्यांची जपणूक करत समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याचा या संमेलनाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर उपस्थित मान्यवरांनी सन्मानित व्यक्तींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अभिजित दरेकर यांना मिळालेला हा सन्मान रायगड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात असून, त्यांच्या कार्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्रतर्फे आंबेडकर जयंती उत्सव समिती जाहीर

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त 'रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र'च्या वतीने जयंती उत्सव समितीची घोषणा करण्यात आली आहे. शुक्रवारी (३ एप्रिल) सुभेदारी विश्रामगृह येथे आयोजित पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही निवड प्रक्रिया सर्वानुमते पार पडली.



अर्शद लखपती
जयंती अध्यक्ष



दिनेश गवळे
जयंती कार्याध्यक्ष



रविकांत मोरे
जयंती उपाध्यक्ष



रणजीत मनोरे
जयंती स्वागताध्यक्ष

नूतन कार्यकारणी खालीलप्रमाणे:
यावर्षीच्या जयंती महोत्सवाचे नेतृत्व करण्यासाठी सक्षम टीमची निवड करण्यात आली आहे:
अध्यक्ष: अर्शाद लखपती
कार्याध्यक्ष: दिनेश गवळे
उपाध्यक्ष: रवी मोरे
स्वागताध्यक्ष: रणजीत मनोरे यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी समितीच्या वतीने १४ एप्रिल रोजी शहरात भव्य वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. शहराच्या मुख्य भागातून निघणाऱ्या या रॅलीच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या विचारांचा जागर केला जाणार असल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

मार्गदर्शक व सल्लागार मंडळ
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनुभवी नेत्यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे:
मार्गदर्शक: राजुभाई साबळे, अविनाश थिट्टे, सुरेश शिनगारे, सुनील खरात, जयनाथ बोर्डे.
सल्लागार: प्रकाश घोरपडे, संतोष उनवणे, प्रदीप धनेधर, राजकुमार अमोलिक, हनु नाना, अनिस गंगापूरकर, जाहीर शेख, भीमराव गाडेकर.
सदस्य: गणेश गौरये, शाहीद लखपती, अशोक गायकवाड, राजू उजगरे, कलीम खान.

# खंडित झालेला परभणी शहर महानगर पालिकेचा पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी । प्रतिनिधी**



परभणी शहर महानगरपालिकेचा पाणीपुरवठा, पूर्णा पाटबंधारे विभागाची पाणीपट्टी थकबाकी न भरल्यामुळे, दि. १ एप्रिल रोजी पूर्णा पाटबंधारे विभागामार्फत खंडित करण्यात आला होता.आता तो सुरळीत करण्यात आला आहे.सदर पाणीपुरवठा तात्काळ पूर्ववत व्हावा यासाठी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर, परभणीचे खासदार संजय (बंडू) जाधव,परभणीचे आमदार डॉ राहुल पाटील, परभणी महानगरपालिकेचे महापौर सय्यद इकबाल,उपमहापौर गणेश देशमुख सभागृह नेते माजु लाला तसेच महानगरपालिकेतील सर्व सन्माननीय सदस्यांनी विशेष प्रयत्न केले. सर्व मान्यवरांनी पाटबंधारे मंत्री मा. श्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्याकडे विनंती करून परभणी शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी केली. सर्व पदाधिकाऱ्यांच्या विनंतीस मान देऊन सुट्टीच्या दिवशीही तातडीने सकारात्मक निर्णय घेत, मा. मंत्री महोदयांनी अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांना परभणी शहराचा पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत आदेशित केले.त्याअनुषंगाने आज दुपारी परभणी शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.याबद्दल परभणी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने संबंधित मान्यवर, लोकप्रतिनिधी यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांची धौस कादंबरी प्रकाशित

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**श्रीरामपूर । प्रतिनिधी**



श्रीरामपूर येथील सुप्रसिध्द चित्रपट गीतकार निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांची धौस कादंबरी पुणे येथील जागतिक किर्ती चे प्रकाशन दिलीपराज प्रकाशन यांनी प्रकाशित केली आहे.

महाराष्ट्रातील लोककलेची झालेली वाताहत या कादंबरीत अतिशय कलात्मक पद्धतीने चित्रीत करण्यात आलेली आहे. तमाशा ही लोककला लयाला जाऊन तिचा ऑर्केस्ट्रा झाला.जागरण गोंधळ लोककलेचा तमाशा झाला. महाराष्ट्राची शान असलेल्या लावणीचा डान्सबार झाला.अंगप्रदर्शन करीत डी जे च्या गोंगाटात अश्लील इशारे करीत पाटील आडनावे धारण करुन अनेक स्वयंघोषित लावणी सम्राज्ञी यांनी लोककलेचा बाजार मांडला.कलाकेंद्राच्या नावाखाली डान्सबार सुरू झाले.शहरातील काळे डांबरी रस्ते खेड्यात आले.ईथल्या पवित्र पायवाटां रोलरने खडी डांबराखाली गाडल्या गेल्या.तरुणपिढी वैफल्यग्रस्त झाली या सर्वांचे वास्तव चित्रण असलेली खास नगरी बोलीभाषेतील कादंबरी अतिशय कलात्मक स्वरुपात वाचकांच्या हातात आली आहे. निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांनी अनेक मराठी चित्रपटात गीतलेखन केलेले असुन चित्ररंग या कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्र भर कलाभ्रमंती केलेली आहे.त्यांच्या अनेक कविता आणि चित्रपट गीतांचा वेगवेगळ्या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झालेला आहे.या समृद्ध अनुभवातुन या कादंबरी चे अतिशय तरल लेखन त्यांनी केलेले आहे.या कादंबरीला जेष्ठ पत्रकार विवेक सबनिस यांची दिर्घ प्रस्तावना लाभलेली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार सरदार जाधव यांचे कलात्मक चित्र लाभलेले आहे.वेगवेगळ्या चित्रपट निर्मिती संस्था यांनी या सत्य घटनेवर आधारित कथानकावर चित्रपट निर्मिती साठी मागणी केलेली आहे. लोकसाहित्याचा अभ्यास असलेल्या नामवंत दिग्दर्शक यांना मी चित्रपट निर्मिती चे अधीकार देणार असल्याची प्रतिक्रिया कवीवर्य बाबासाहेब सौदागर यांनी आमच्या प्रतिनिधीना दिलीआहे.

# उदगीर येथील अधिवेशनासाठी परभणी जिल्ह्यातून ३५० पत्रकार जाणार -प्रा.सुरेश नाईकवाडे



**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील परभणी शहरासह आणि नऊ तालुक्यातील प्रिंट मीडिया आणि डिजिटल मीडियाचे ३५० पत्रकार अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्या उदगीर येथे होणाऱ्या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनास उपस्थित राहणार असल्याची माहिती परिषदेचे सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे यांनी दिली आहे अ. भा.मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन दि.१८ व १९ एप्रिल २०२६ रोजी उदगीर येथे आयोजित केले आहे. या अधिवेशनाच्या पूर्वतयारी साठी परभणी जिल्ह्यातील नऊ तालुक्याचा दौरा परिषदेचे सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे यांच्या नेतरत्वाखाली प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजू हट्टेकर, जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके, कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर, सदस्य विठ्ठल वडकूते यांच्या टीम ने दोन दिवस केला .त्यात जिंतूर,सेलू,मानवत,पाथरी,सोनपेठ,गंगाखेड,पालम,पूर्णा या तालुक्यातील तालुका पत्रकार संघ तसेच ताडकळस, बोरी,गौर येथील वार्ताहर संघाच्या पदाधिकारी आणि पत्रकारांशी थेट सवांद साधून उदगीर येथिल अधिवेशनात सहभागी होण्याबाबत नियोजन केले. या वेळी उपस्थित सर्व पत्रकारांनी उत्स्फूर्तपणे स्वखर्चाने जाण्याचे जाहीर केले.या अधिवेशनातून राज्यातील पत्रकारांना नवी दिशा मिळणार असल्याने जिल्ह्यातील प्रिंट मीडिया आणि डिजिटल मीडिया तसेच साप्तहिक सेल च्या सर्व पत्रकारांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे .

## या स्वातंत्र्यातही



माझ्या जगण्यातला
संविधानिक बदल
त्यांनाही जाणवतोय
आणि मीही अनुभवतोय
या देशाला
स्वातंत्र्य मिळाले नसते तर
आणि हा देश सार्वभौम
प्रजासत्ताक झाला नसता तर
बदललेच नसते
माझे जगणे
कोंडवाड्यातच
मला कोंडून ठेवले असते
इथल्या समाज व्यवस्थेने
मला अजूनही...
या स्वातंत्र्यातही
पुन्हा सुरू झालीय चाचपणी
कालची गुलामी व्यवस्था
माझेवर लादण्याची
मला आता अधिकच
सावध राहावे लागेल
या वर्तमानातही

**शशिकांत हिंगोणेकर**



**मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवछत्रपती महाविद्यालयाची खेळाडू कु. निलम रगडे हीची दि.३ ते ७ एप्रिल २०२६ सिन्नर (नाशिक) येथे होणाऱ्या७३ वी प्रौढ गट महिला व पुरुष राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत निवड झाली आहे तसेच प्रतीक्षा पवार हिची महिला संघ व्यवस्थापक म्हणून निवड झाली या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एस. पाटील, उपप्राचार्य भरत वहाठूळे व क्रीडा विभाग प्रमुख डॉ.अर्चना कोल्हे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना प्रा.किशोरी हिवर्डे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.**

# नूतन जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड यांनी स्वीकारला पदभार



**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**लातूर । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज (दि.०४) मावळत्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडून पदभार स्वीकारला. श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी त्यांचे स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यांच्यासह अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.